## मूळ गुणपत्रिका /प्रमाणपत्र गहाळ झाल्यास अथवा उपलब्ध नसल्यास
## ( इ.१०वी व १२वी)

**१. गुणपत्रिकेची द्वितीय प्रतः-**

मंडळ अधिनियम १९६६ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्र. ५६ माध्यमिकसाठी व उच्च माध्यमिक करिता नियम क्र. १०३.

**२. प्रमाणपत्राची द्वितिय प्रत :-**

मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनिमय १९७७ मधील नियम क्र. ६१ (माध्यमिक)/उच्च माध्यमिक करिता नियम क्र.१०८

**कार्यपध्दती:-**

कनिष्ठ महाविद्यालय / शाळा प्रमुखांचे शिफारशीचे पत्र, विहित नमुन्यात आवश्यक त्या माहितीसह नाव, बैठक क्रमांक, परीक्षा वर्ष इ. माहिती तसेच स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavite) सादर करणे अनिवार्य आहे.

परीक्षा उत्तीर्ण होण-या उमेदवाराला मंडळाकडून गुणपत्रक/प्रमाणपत्र मूळ प्रत दिल्यानंतर प्रमाणपत्राची दुबार मागणी झाल्यास मुळ गुणपत्रक दिलेल्या तारखेपासुन तीन महिन्याच्या आत दुबार प्रत देण्यात येणार नाही.

परंतु अत्यंत निकड असल्यास विभागीय सचिवांच्या परवानगीने आवश्यक कागद पत्रांची पुर्तता करण्याच्या अटीवर दुप्पट शुल्क आकारून शाळाप्रमुखांमार्फत देण्यात येते.

**गुणपत्रक/ प्रमाणपत्र शुल्क आकारणी:-**

| | |
|---|---|
| १. पहिली प्रत | रू.१००/- |
| २. दुसरी प्रत | रू. २००/- |
| ३. तिसरी प्रत | रू. ३००/- |
| ४. तातडीने ७२ तासात (३ दिवस) | रू. १००/- (Extra) |
| ५. कोरा फॉर्म | रू. २/- |

**गुणपत्रक/ प्रमाणपत्र शुल्क आकारणी (मागील १० वर्षापेक्षा जुने)**

| | |
|---|---|
| १. पहिली प्रत | रू.२००/- |
| २. दुसरी प्रत | रू. ४००/- |
| ३. तिसरी प्रत | रू. ६००/- |
| ४. तातडीने ७२ तासात (३ दिवस) | रू. १००/- (Extra) |
| ५. कोरा फॉर्म | रू. २/- |

## स्थलांतर प्रमाणपत्र देणेः (Migration)

महाराष्ट्राव्यतिरिक्त अन्य राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी तसेच इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक असते. मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ नियम क्रमांक ६० इ. १० वी करिता व नियम क्रमांक १०७ इ. १२ वी करिता......

मंडळाने घेतलेल्या इ.१० वी इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर स्थलांतर प्रमाणपत्र देता येते. अर्जासोबत गुणपत्रिकेची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत आवश्यक आहे.

द्वितीय स्थलांतर प्रमाणपत्रासाठी रू १००/- च्या स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र व शाळा प्रमुख /कनिष्ठ महाविद्यालय शिफारस पत्र अनिवार्य आहे.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र देता येत नाही.

**शुल्क आकारणीः-**

| | |
|---|---|
| १. स्थलांतर प्रमाणपत्र शुल्क | रू.१००/- |
| २. स्थलांतर प्रमाणपत्र-द्वितीय प्रत | रू. ५००/- |
| ३. कोरा फॉर्म | रू. २/- |

********************************

## तात्पुरते प्रमाणपत्र देणे (**Provisional certificate**)

मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६४ माध्यमिक करिता व नियम क्रमांक १११ उच्च माध्यमिक करिता

मंडळ परीक्षेस प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास तात्पुरते उत्तीर्ण प्रमाणपत्र देता येते. विद्यार्थ्याने आवश्यक माहितीसह शाळाप्रमुखांच्या शिफारस पत्रासह विहीत प्रपत्रासह अर्ज करावा. अर्जासोबत गुणपत्रिकेची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

प्रमाणपत्र वैधता - मूळ प्रमाणपत्र मिळेपर्यत.

**शुल्क आकारणी:**

| | |
|---|---|
| उत्तीर्णतेचे तात्पुरते प्रमाणपत्र | रू. २५/- |
| कोरा फॉर्म | रू. २/- |

## प्रमाणपत्रातील / गुणपत्रिकेतील नोंदी दुरूस्त करणे

## (नाव आणि जन्मतारीख )

मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५९(३) माध्यमिक व नियम क्रमांक १०६ (३) उच्च माध्यमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रमाणपत्रामध्ये जन्मतारीख व नावातील दुरूस्ती जनरल रजिस्टर प्रमाणे दुरूस्ती करणेबाबत मार्च २००७ पर्यत निकाल जाहिर झाल्यापासून ३ वर्षापर्यत केली जात होती. परंतू महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक एच.एस.सी. २००७ /३५१/७ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई ३३ दि. ८/९/२००९ च्या पत्रानुसार वरील नियमात दुरूस्ती करून ३ वर्षाची अट शिथिल करण्यात आली.

निकाल जाहीर झाल्यानंतर दुरूस्ती असेल तर पहिल्या ०६ महिन्यापर्यत परीक्षा शाखेमार्फत दुरूस्ती केली जाते. त्यानंतर कार्यालयातील शाखा एनमार्फत कार्यवाही करण्यात येते.

माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांच्या निवेदनासह दुरूस्तीबाबतचे पत्र तसेच मा. शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांची सही व शिक्क्यासहीत प्रमाणीत केलेले घोषणा पत्र, माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय मूळ जनरल रजिस्टर व विद्यार्थ्याचे नाव असलेल्या पानाची मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली छायांकित प्रत, शाळा सोडल्याची मूळ दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकित प्रत इ. प्रपत्रासह शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत कार्यालयात प्रस्ताव सादर करावा.

**शुल्क आकारणी :–**

| | |
|---|---|
| १. पहिले वर्ष – | रू. १००/– |
| २. त्यापुढील प्रत्येक वर्ष – | रू. २००/– |

## प्रमाणपत्र / गुणपत्रक पडताळणी

मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनिमय १९७७ मधील नियम क्र.५७ (८) माध्यमिक करिता व नियम क्र.१०४ (१०) उच्च माध्यमिक करिता सरकारी, निमसरकारी कार्यालय व खाजगी संस्थेमध्ये किंवा उच्च शिक्षणास प्रवेश घेताना (गुणपत्रिका व प्रमाणपत्र) परीक्षेच्या संपादणुकीची खात्री करून देण्यात येते.

संबंधीत संस्थेमार्फत किंवा कार्यालयामार्फत अथवा विद्यार्थ्याकडून लेखी अर्ज व छायांकीत प्रत इ. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर हस्तपोहोच किंवा टपालाद्वारे संबंधित संस्थेस प्रमाणपत्र पाठविले जाते.

**शुल्क आकारणीः–**

**अ. शासकीय /निमशासकीय संस्था–**

| | |
|---|---|
| १. २० उमेदवारापर्यंत. | रू २००/- |
| २. २० पेक्षा अधिक - प्रति उमेदवार. | रू २० /- |

**ब. वैयक्तिक/खाजगी धंदेवाईक संस्था –**

| | |
|---|---|
| १. २० उमेदवारापर्यंत. | रू. ४००/- |
| २. २० पेक्षा अधिक - प्रति उमेदवार. | रू. ४०/- |

**क. संरक्षण खात्याशी संबंधीत –**

पायदल, नौदल, वायुदल तसेच केंद्रिय राखीव पोलिस दलासाठी **निशुल्क**